नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/11/2022 (रविवार) दुपार

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध कारवाई

पो.स्टे. कुही :– दिनांक ०५/०२/२०२२ रोजी कुही पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा मांढळ या मार्गावर काही इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन दिनांक ०५/११/२०२२ चे १४.३० वा. ते १५.१५ वा. चे सुमारास अंतर्गत १२ किमी अंतरावर मौजा मांढळ येथे कुही पोलीस पथकाने नाकाबंदी केली असता यातील आरोपी नामे– १) मनोज गुडेरावजी ठवकर, वय ३२ वर्ष, रा. लोहारा, ता. कुही २) कवडु रंगारी, वय ५७ वर्ष, रा. चापेगडी ता. कुही यातील आरोपी क्र. ०१ याने आरोपी क्र. २ याचे सांगणेवरून त्याचे ताब्यातील पिवळया रंगाची टाटाएस गाडी क्र. एम एच ४० –७२१३ किमती अंदाजे २,००,००/– रू. २) एक काळया रंगाची म्हैस किंमती अंदाजे ४०,०००/–रू. ३) तिन लहान हले किंमती अंदाजे प्रत्येकी १००००/–रू. प्रमाणे ३०,०००/– रू. ४) एक लाल रंगाचा गोरा किंमती अंदाजे ७,०००/–रू. जनावरे यांना अत्यंत क्रुर व निर्दयतेने कोंडुन दोराने पायांना बांधुन एकावर एक रचुन निर्दयतेची वागणुक देत मिळुन आल्याने व चौकशीवरून सदरचा गुन्हा नोद करून तपासात घेतला. वाहनासह असा एकुण किंमती २,७७,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलीस हवालदार सुधीर, पो.स्टे. कुही यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कुही येथे वरील आरोपीविरुध्द कलम ११ (१) (क) (ड) (च) (ज) (झ) प्राण्यांना निर्दयतेने अधिनियम १९६० काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन कुही करीत आहे.

## अपघातात मृत्यु

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०३ कि. मीं अंतरावरील काटोल ते सावरगाव रोड जाम नदीचे पुलाजवळ येथे दिनांक ०६/११/२२ चे १२.३० वा. ते १२.५२ वा. सुमारास यातील फिर्यादी नामे– संजय महादेव रिठे व ४८ वर्ष रा. काळे चौक काटोल या पुतण्या मृतक नामे– योगेश रमेशराव रिठे, रा काळे चौक काटोल हा आपली नविन गाडी नबर नसलेली मोपेड जुपीटर गाडीने शेतातुन घरी जात असता यातील ट्रेलर गाडी क्र सि.जी १३, एल –४६५१ चे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवित आणुन त्यांचे गाडीवरचे नियंत्रण बिघडल्याने ट्रेलर गाडी क्र सि.जी १३–एल –४६५१ हि मृतकच्या अंगावर पडल्याने मृतक योगेश रमेशराव रिठे, रा काळे चौक काटोल यांचे मरणास ट्रेलर गाडी क्र सि.जी १३ , एल –४६५१ चा चालक कारणीभुत ठरला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन काटोल करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर